# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. ६४८ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक १२/१२/२०१८


## विशेष वार्तापत्र

## फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेचा प्रतिसाद वाढला शेतीच्या हंगामातही फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेची उपस्थिती

**भंडारा:—** जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात दिनांक ०८/१२/२०१८ रोजी जिल्हयात ठिकठिकाणी फिरते पोलीस- स्टेशन कॅम्प लावण्यात आले होते. यामध्ये पोलीस स्टेशन जवहरनगर अंतर्गत ग्राम कवडसी येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले. ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक बारसे, पोलीस उपनिरीक्षक व ६ कर्म यांनी महिलांवर होणारे अत्याचार, एटीएम फसवणुक, कोणालाही एटीएम आधार नं. देवु नये. त्यामध्ये ३०० स्त्री व पुरुष हजर होते. पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत ग्राम सुकळी येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. त्यामध्ये स्त्री व पुरुष १५० हजर होते. सदर फिरते पोलीस स्टेशन दरम्यान मानवी हक्क दिना निमीत्त संवीधानाने मानवाला कोणते अधिकार दिलेले आहेत. याविषयावर माहीती सांगण्यात आली. तसेच गावातील तंटे व ईतर समस्या बाबत विचारणा करण्यात आली. जेष्ठ नागरीक तसेच महिलांवर होणारे अत्याचार बाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे फानेव्दारे अनोळखी व्यक्तीचे कॉल आल्यास आपले बॅकेचे खाते क्रमांक, एटीएम क्रमांक, सांगु नये तसेच गावांत कोणीही अंश्रध्दलेला व जादुटोन्याला बळी पडू गावांत वाद निर्माण होत असेल अश्या व्यक्तीची समजुत घालून त्याला त्वरीत पोलीस स्टेशनला घेवुन यावे. असे सांगण्यात आले. तसेच गावातील तरुण मुले यांना स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन करण्यात आले. फिरते पोलीस स्टेशन दरम्यान इतर समस्या बाबत चर्चा करण्यात आली. व लोकांचे समाधान करण्यात आले. पोलीस स्टेशन आंधळगांव अंतर्गत ग्राम नवेगाव येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. सपोनि. सोनटक्के व ३ कर्म यांनी जनतेला एटीएम फसवणुक, ऑनलाईन फसवणुक, महिला अत्याचार, बेटी बचाओ, बेटी पढाओ, बाल विवाह, बाल लैगिक अत्याचार, सिटीजन पोर्टल, हेल्मेंट वापरा संबंधी माहीती, तसेच शेतातील ठेवण्यात येणारे धान चोरी होवु नये याकरीता त्यांची रखवाली करण्याच्या सुचना देण्यात आल्या. तसेच आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवसानिमीत्त योग्य मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन अडयाळ अंतर्गत ग्राम पिलांद्री येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक मोरे व ३ कर्म यांनी जनतेला महिलांवर तसेच बालकांवर होणारे अत्याचार याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. एटीएम फ्रॉड, गावामध्ये संशयीत इसम आढळल्यास किंवा अनोळखी इसम आढळल्यास त्वरीत पोस्टेला माहीती कळवावी. भंडारा जिल्हयाहमध्ये मुली गुम होण्याचे प्रकार वाढले असल्याने

त्याविषयी मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत ग्राम सोनका येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. एटीएम फसवणुक, चोरी, घरफोडी होवु नये. हेल्मेंट सक्ती बाबत माहिती दिली. कायदे विषयक शिबीर आयोजीत करण्यात आला. असुन सदर कार्यक्रमात **श्री. वाळके मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय साकोली यांनी** शाळेतील विद्यार्थीना विवीध अडचणी योजना व कायदे विषयक कायदे फिरते पोलीस स्टेशन बाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत खातखेडा येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. त्यामध्ये ठाणेदार चकाटे व ३ कर्म यांनी हेल्मेंटचे फायदे, एटीएम पासबुक बाबत मार्ग महिलावरील अत्याचारा बाबत मार्गदर्शन केले. चोरी, घरफोडया याविषयी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन लाखनी येथील ग्राम मानेगाव येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. महिला पोलीस उपनिरीक्षक आडे व ४ कर्म यांनी गावातील छोटे तंटे गावातच निपटारा होण्या बाबत तसेच प्रतिसाद ॲप्स, महिला विषयक कायदे, चोरी, घरफोडी संबंधी माहिती, ऑनलाईन फ्रॉड वाहण ध्वनी प्रदुषण, मानवी हक्कबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गाव दारु बंदी करणे महिला अत्याचार गावात शांतता व सुव्यवस्था राखण्या बाबत सुचना देण्यात आल्या. पोलीस स्टेशन दिघोरी अंतर्गत येडगाव येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक गांवडे व ३ कर्म यांनी रात्रघरफोडी, चोरी यासारखे गुन्हे होवु नये म्हणुन रात्रगस्त लावावी. एटीएम कोड नं. कोणत्याही व्यक्तीला सांगु नये गावात अवैध धंदे चालणार नाही याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वाहतुक नियम व हेल्मेंट याविषयावर माहिती देण्यात आली. त्यामध्ये स्त्री व पुरुष ५० उपस्थित होते. पोलीस स्टेशन पालांदुर अंतर्गत तिरखुरी फिरते पोलीस स्टेशन आयोजीत केले होते ४ कर्म यांनी महिला वरील अत्याचाराबद्दल माहीती देण्यात आली. गावातील छोटया मोठया तक्रारी पोलीस पाटील आणि तंटामुक्ती अध्यक्ष यांच्यामार्फत समाधान जर होत तसेल तर पोलीस स्टेशनला तक्रार देण्यात यावी. मोबाईल कसे हाताळावे. व्हॉट्सॲपचा वापर कसा करावा आणि फेसबुकचा वापर कश्यासाठी करावा याबाबत माहीती दिली. पोलीस स्टेशन लाखांदुर अंतर्गत ग्राम विरली येथे फिरते पोलीस स्टेशन आयोजीत केले होते. ठाणेदार मेश्राम व ३ कर्म गावातील लहान सहान तक्रारीच्या समस्या विचारपुस करण्यात आल्या. मोबाईलवरुन होणारे गुन्हे, बॅक व एटीएम बाबत माहीती दिली. पैश्याचे व्यवहार बाबत माहीती दिली. बॅक लोन देणे बाबत फसवणुक बालकांचे लैगिक कायदे बाबत माहीती दिली. पोलीस भरती व हेल्मेंट सक्ती बाबत माहीती दिली. पोलीस स्टेशन सिहोरा मछेरा येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले होते. ४ कर्म यांनी एटीएम फसवणुक, ऑनलाईन फसवणुक, महिला अत्याचार, बेटी बचाओ, बेटी पढाओ, बाल विवाह, बाल लैगिक अत्याचार, सिटीजन पोर्टल, हेल्मेंट वापरा संबंधी माहीती, तसेच शेतातील ठेवण्यात येणारे धान चोरी होवु नये याकरीता त्यांची रखवाली करण्याच्या सुचना देण्यात आल्या. तसेच आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवसानिमीत्त योग्य मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन भंडारा येथे

फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. तेथे परिपोलीस उपनिरीक्षक व कर्मचारी यांनी मानवी हक्क दिवसा बाबत ऑनलाईन व्दारे होणारी फसवणुक हेल्मेंट वापरण्या बाबत माहीती देण्यात आली.

एकुणच पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांच्या संकल्पनेतुन राबविण्यात येत असलेल्या फिरत्या पोलीस स्टेशन उपक्रमाचे फायदे जनतेच्या लक्षात येत असल्याने रोहणीचा व शेतातील ईतर महत्वाचे कामांचा हंगाम सुरू असुनही लोक मोठया प्रमाणावर फिरत्या पोलीस स्टेशनला हजर राहुन जनतेकडून मोठया प्रमाणावर हजर राहून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसुन येत आहे. लोक त्याचे तक्रारींचे निवारण करून घेत आहेत. तसेच पोलीसांकडुन मिळणा—या वेगवेगळया सुचनांची माहीती घेत आहेत. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होत असुन जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधीत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाधिक लोकांनी फिरते पोलीस स्टेशन उपक्रमात सहभागी होवुन आपल्या समस्या व तक्रारी सोडवणुन घ्याव्यात विनाकारण न्यायालयापर्यंत नेवु नये आपल्या वेळेची व पैशाची बचत करावी व गावामध्ये शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जिल्हा वासीयांना केले.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता